कलम **4 (1) (ब) 17**

**<u>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे कार्यालयातील प्रकाशित माहिती</u>**

1) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा धुळे कार्यालयांतर्गत राबविण्यात येणारी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजने (ग्रा.) अंतर्गत बेघर Generated priority list (प्राधान्यक्रम) यादी शासनाच्या Awassoft या संकेत स्थळावर प्रकाशीत करण्यात आलेली आहे.
2) दा. रे. कुटुंब गणना 2002-07 यादी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा स्तरावर, तालुकास्तर व ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध आहे.
3) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्थापित महिला बचत गटांची यादी आणि माहिती पंचायत समिती स्तरावर तालुका अभियान व्यवस्थापक यांचेकडे उपलब्ध आहे.

---

**<u>सर्व सामान्य लोकांशी संबंधित महत्वाचे निर्णय व धोरणे यांची यादी प्रकाशनाकरिता तयार करणे.</u>**

सर्व सामान्य लोकांशी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयासंबंधी महत्वाचे निर्णय व धोरणे यांची यादी वेळोवेळी शासन निर्णयाचे निकष व अटीनुसार प्रकाशना करिता तयार करणेत येईल व संबंधितांना देखील वितरीत करण्यात येईल.

---

**कलम 4 (17) (ड)**

सर्वसाधारणपणे आपल्या कार्यालयात होणा-या प्रशासकीय / अर्धशासकीय कामकाजाच्या प्रकरणाची यादी तयार करणे, घेतलेल्या निर्णयाबाबत कार्य करणाची मीमांसा या पुढे देण्यात येईल असे जाहिर करणे.

सर्वसाधारणपणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील वेळोवेळी कार्यान्वित शासकीय कामकाजा बाबतची माहिती तसेच जिल्हा विकास व सनियंत्रण समिती (दिशा), नियामक मंडळ व कार्यकारी समिती यामध्ये घेतलेल्या निर्णयाची तसेच म. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धुळे तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यांनी विभागा संबंधी घेतलेल्या निर्णया बाबतची माहिती जाहिर करण्यात येईल.

टिप- लोकप्राधिकारी/ शासकीय माहिती अधिकारी हे सुचना फलक/वर्तमानपत्र सार्वजनिक सुचना, प्रसार माध्यमे, सुचना प्रसार, इंटरनेट इ. चा उपयोग माहितीच्या प्रसारासाठी करणे.